
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. वा.
दा. क्र. १५६५०





IRBK-0115670

विजय तेंडुलकर

© १९६५, विजय तेंडुलकर

प्रथमावृत्ति : १९६५

किंमत एक रुपया

मुखपृष्ठ-रेखाचित्रे :
वसंत सरवटे

मौज प्रकाशन : ११६

मुद्रक : वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४ बीआर

प्रकाशक : वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४ बीआर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासीक परत करावे

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र.

# पाहुण्याच्या पोरीचं लगीन

विजय तेंडुलकर

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन

मुंबईच्या विजय मित्र मंडळातर्फे झालेल्या १९६३च्या आंतरशालेय नाट्यस्पर्धेत या नाटिकेचा प्रयोग जनरल एज्युकेशन सोसा-यटीच्या मुलींच्या शाळेतर्फे सौ० सुलभा देशपांडे यांनी सादर केला आणि तो पहिल्या क्रमांकाचा ठरून त्याला चांदीची ढाल मिळाली.



म. ग्रं. सं. पुणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १५६७० नों. दि.
IRBK-0115670

[ मुलगा १ खोट्या खोट्या शेकोटीसमोर बसून खोटा खोटा ताशा शेकतो आहे. हा काशा ताशेवाला. टोपी मानेच्या काल्यापर्यंत मागे नेलेली आणि पुढले केस पिंजारलेले. ]

*मुलगा १* : (प्रेक्षकांना विश्वासात घेत) **मी काशा ताशेवाला. माझ्यासारखा ताशा आसपासच्या दहा गावात कुणी वाजवीत नाही. कारण कुणाकडे ताशाच नाही. लगीन म्हटलं की ताशा मी वाजवणार ! मी ताशा गरम करतोय. आज पाटलाच्या पोरीचं लगीन आहे. रात्री वरात निघणार**

आहे. असा कडक वाजवतो की ऐकणाराच्या कानातल्या मुंग्याच पळाल्या पाहिजेत! फार दिवसात बघा, गावात कुणाचं लगीनच झालं नाही. शेवटचं झालं ते गणपत वाण्याच्या दुकानातल्या मुंगळा-मुंगळीचं. गणपत वाणी—त्याच्या दुकानात साखरेच्या गोणी. त्यांना येतात मुंगळे. ते आणतात मुंगळ्या. पण गणपत वाणी फार प्रेमळ. त्यानं पाळला एक मुंगळा. त्याच्याकरता शोधली एक मुंगळी. आणि दिला उडवून लग्नाचा बार. दोन उंदरांच्या गाडीतनं वरात निघाली होती. मीच या हातानं ताशा बडवला. कडकडकडकड धूम्...कडकड धूम्...कडधूम्...गणपत वाणी बहिरा झाला तो तेव्हाच. आता 'गूळ कसा शेर' विचारलं, तर 'गणपत नथ्थूराम वाणी' म्हणून सांगतो! (फिस्सकन येऊ पहाणारे हसू हात तोंडावर धरून कसेबसे दाबतो.) त्यानंतर आता हे पाटलाचं लगीन. (खोट्या खोट्या शेकोटीचा चटका बसून 'ओय' करीत) नव्हे नव्हे, पाटलाच्या पोरीचं लगीन. गडबडगावच्या गप्पीदास गोलगप्पे नावाच्या माणसाच्या चुलत्याच्या काकाच्या चुलत चुलत चुलत्याच्या.. (तो नाद सोडून देऊन) जाऊ दे झालं. थोडक्यात म्हणजे आमच्या गावच्या पंपू पवाराशीच. पंपू पवार रात्र कशी संपते आणि दिवस कसा उजाडतो ते पहायला

वाघनाथाच्या डोंगरावर रोज रात्रभर जाऊन बसायचा. आणि रात्र संपायच्या आधी पाच मिनिटं गडी डुलकी खायचा तो दिवस उजाडल्यावर तासानं उठायचा. त्याला रात्र संपताना काय दिसत नसे, आणि दिवस उजाडताना तो घुर्रघुर्र घोरतच असायचा. आता, वाघनाथाच्या डोंगरावर रहातो वाघ. तेव्हा पाटील म्हणाला, पंपूला वाघ नाहीतरी केव्हातरी खाणारच; मग आपल्या पोरीशी त्याचं लगीन का करून देऊ नये? पाटलानं पंपूला विचारलं. पपूनं वाघाला विचारलं. वाघ तसा आमच्या गावचाच, तो म्हणाला, "कालच मी एक बोकड मारलाय. सध्या मला भूक नाही. पोटाला तडस लागल्यय. उठवत नाही, बसवत नाही. तर पंपू, तू खुशाल लगीन कर." म्हणून पंपू लगीन करतो म्हणाला. तेच आजचं लगीन—आणि त्यासाठीच—(आठवण होऊन गडबडीने ताशा गरम करू लागतो. खोट्या खोट्या विस्तवावर फुंकर घालतो. डोळ्यात राख आणि धूर जातो म्हणून डोळे चोळतो.) ताशा आधी चांगला तापवला पाहिजे.



[मुलगा २ विचित्र वाटेल असा पोषाख करून येतो. हा नान्या बहुरूपी. स्वभावाने गमत्या.]

*मुलगा २* : काय ताशा काशेवाले, काशा गरम करताय वाटतं?

*मुलगा १* : नाही. ताशा गरम करतोय.

*मुलगा २* : मग मी तरी तेच म्हणालो. का गरम करताय? त्याला थंडी वाजते?

*मुलगा १* : नाही.

*मुलगा २* : मग? उकडतं?

*मुलगा १* : उकडलं तर गरम कोण करील?

*मुलगा २* : मग तुम्हीच तर म्हणालात थंडी वाजत नाही म्हणून!

*मुलगा १* : अहो, विस्तवावर तापवतोय कडक वाजावा म्हणून.

*मुलगा २* : तो कशाला?

*मुलगा १* : अहो, आज रात्री पाटलाच्या पोरीच्या लग्नाची वरात आहे ना.

*मुलगा २* : असं असं. आणि लगीन?

*मुलगा १* : ते दुपारला आहे.

*मुलगा २* : उद्या दुपारला?

*मुलगा १* : अहो, वरात आज रात्री तर लगीन उद्या दुपारला कसं असेल?

*मुलगा २* : असं असं. शहरचा ब्यांड आणणार आहेत म्हणे वरातीला.

*मुलगा १* : मग आभाळातली दिवाबत्ती पण आणणार असतील! आणि रूमशामचा घोडा, नवरानवरीला बसायला! वा, नारायणराव! आपला पाटील

म्हणजे जसा आटपाट नगरचा राजाच की नाही!

*मुलगा २* : खाजगी सांगू का? तुमच्या–आमच्यातच ठेवा. पण राजा मीच आहे. आणि पाटील शेणापती. तुम्ही परधानजी होत असलात तर बोला. करून टाकू नेमणूक!

*मुलगा १* : आणि मग ताशा कोण वाजवील?

*मुलगा २* : तो कशाला वाजवायचा? मला येतो की तोंडानं वाजवता. हा बघा.

(तोंडाने घुमतो ताशासारखा.) बरं विडी टाका एक.

मी जातो.

माझं लगीन काढलंय औंदा.

नवरी शोधतोय.

(ओठांनी प्रथम ताल घुमवून मग त्याच तालात)




बत्त्या आणल्या सात
त्यांना एक पण नाही वात
लाडू केले दहा
त्यातले उंदीर खातो सहा
भटजी म्हणाला येतो
त्याचा आजच फुगला पोटो
अडीच घोड्यांची गाडी
तिला छपरासकट माडी
आणि चाक एक पण दिसेना
अहो बाजीराव नाना!
बाजीराव नाना आता नवरी शोधून द्या ना!
ओ बाजीराव नाना तुम्ही नवरी शोधून द्या ना!
तुम्ही नवरी शोधून द्या ना
मला नवरी शोधून द्या ना
तुम्ही—



[ मध्येच थांबून विडी वसूल करून रामराम करून निघून जातो. ]

*मुलगा १ :* (प्रेक्षकांना) **हा नाऱ्या बहुरूपी. मोठा गमत्या माणूस आहे. झोपल्या झोपल्यासुद्धा करमणूक करील. गावातली पोरं याच्यावर एकदम खूष. वेडपट वाटतो, पण वेडपट नाही. गडी चांगला हुषार आहे. सगळ्यांना आपण आवडलं म्हणजे न मागता सगळं काही मिळतं, हे त्याला चांगलं ठाऊक आहे. शहरातून ब्यांड आणणार म्हणे! या काशाच्या घनचक्कर ताशाबिगर गावात लगीन वाजणार नाही, म्हणावं. आणि हे तर पाटलाचं लगीन—नव्हे, नव्हे. पाटलाच्या पोरीचं लगीन.** (स्वतःशीच हसतो.) **नाऱ्या म्हणजे नाऱ्या आहे.**

[पाटलाची खोटी-खोटी बैलगाडी हाकत मुलगा २ घुंगूर वाजवीत येतो. घुंगूर खरे. हा पाटलाचा गडी संभा. त्याच्या मागोमाग पाय आणि हातही टेकून एक टिल्लू मुलगा ४ तुरूतुरू येतो. याची जीभ बाहेर, त्यावरून हा कुत्रा हे कळते. हे दोघे स्टेज ओलांडून जाऊ लागतात, न थांबता.]



*मुलगा १* : रामराम संभाजीराव—

[दोघे चाललेच आहेत.]

अरे ए संभ्या!

[पट्‌दिशी थांबून मुलगा ३ टवकारून पाहू लागतो वळून. मुलगा ४ जरा पुढे जाऊन वळून थांबलेला.]

*मुलगा ३* : अंगा आस्सं म्हना की! (खोट्या खोट्या बैलगाडीवरून सफाईने उडी टाकून येत) म्या म्हंगालो कोन त्यो संवाजीराव! रामराम, रामराम ताशेवाले. ताशा तापवताय जनू?

[मुलगा ४ कुत्रा बसतो तसा, उभ्या जागी बसलेला. बसल्या बसल्या अंगावरच्या माशा, पिसवा, उडवतो.]

*मुलगा १* : हो. रात्री वरात आहे ना. तू कुठं निघालास बाबा?

*मुलगा ३* : चालली न्हवं शहराला. वरातीला ब्यांड आणायची आडुर हाय मालकांची. ते वं, जरीची कापडं घालूनशान आखडल्यावानी ढेंगा टाकत प्याँ प्याँ धुंवड धुंबड करत्याती ते. गाडीत घालूनशान घेवून ये म्हंगाले मालक. जातो. रामराम—(उठतो. निघतो.)

[मुलगा ४ उठून तात्काळ कुत्र्यासारखा उभा रहातो.]

*मुलगा १* : संभाजीराव—

[छे ! गडी खोट्या खोट्या गाडीत चढून बैलांना चुचकारत निघालादेखील. मागोमाग मुलगा ४ (कुत्रा).]

आरं ए संभ्या, ल्येका थोप की !

[पुन्हा एकवार आता मुलगा ३ (ऊर्फ संभाजीराव) थबकलेला. त्याच्याबरोबर मुलगा ४ देखील थांबलेला.]

*मुलगा ३* : (गाडीतच राहून) बोला. बेगिन बोला पन. काय म्हनतासा ?

*मुलगा १* : (त्याच्यापाशी जाऊन) खरं म्हणतोस ब्यांड आणायला चाललास ते ?

*मुलगा ३* : तर वं ! रामाशपत ! सुटली म्हना पर—म्हना आदुगर सुटली—आंदी म्हना—

*मुलगा १* : सुटली.

*मुलगा ३* : अंगाऽस्सं !

*मुलगा १* : पाटलांनी सांगितलं तुला ब्यांड आणायला ?

*मुलगा ३* : व्हय. (तेवढ्यात आगेकूच करू पहाणाऱ्या खोट्या खोट्या बैलांना नावाने हाकारून प्रयासाने आवरून) पाटलिनीची बी फार विच्छा हाय. पोरीचं लगीन चांगलं वाजतगाजत जोसात व्हावं—थाटामाटानं.

*मुलगा १* : थाटामाटानं? बाकी ब्यांडवाल्यांचे जरीचे रंगीबेरंगी कपडे कसे शोभून दिसतात वरातीत, नाही रे संभा?

*मुलगा ३* : भलतेच. झ्यक् झ्यक् करत्यात निस्ते. आन् ती टोपी. वा! मला तर वाटतं का लग्नात नवरदेव होन्यापरीस ब्यांडवालाच व्हावं, बगा! अवं काय त्याचा थाट, काय रुबाब! आन् वाजतो तरी कसा टेचात! त्याची गानीबी इलायती! आन् त्यो ढोल, त्यो डरम! तुमच्या ताशाला न्हाय बगा सर त्याची! न्हायच! (मुलगा १ गप्प.) का वं, गपसे झालासा?

*मुलगा १* : (उसासत) ताशाला ब्यांडची सर नाही.

*मुलगा ३* : कसं बोललासा? ब्यांडफुडं ताशा म्हंजे बेंडवाजाफुडं पिपाणी म्हनाना! न्हाय तर सूर्यांफुडं काजवा! वाजला, न्हाय वाजला सारका! सारकं आपलं तडा तडा तडा! कान किटत्यात निस्ते! सांगू का ताशेवाले तुमाला? तुमी आता योक ब्यांडच इष्टार्ट करा. काय? पैशेबी मोप मिळत्याल, कापडं बी मस्त घालायला गावत्याल. मस्त मजा यील. (गडबडीने) जातू—घाई हाय—रातचे या वरातीला—ब्यांडची मजा वघायला. रामराम—



[आपलीच खोटी खोटी शेपटी तोंडात पकडू पहात कुत्र्यासारखा स्वतःभोवती फिरणारा मुलगा ४ आता

हुशार होऊन पुढे निघण्याला तयार होतो; जीभ बाहेर.
मुलगा ३ खोश्या खोश्या बैलजोडीला चलण्याचा इशारा देतो आणि घुंगूर वाजवीत जातो. मागोमाग मुलगा ४.]

*मुलगा १* : (हळूहळू येऊन बसतो, निराश होऊन.) **ब्यांडपुढं ताशा म्हणजे सूर्यापुढं काजवा! ताशाला ब्यांडची सर नाही. तो जरीचा रंगीत थाटमाट नाही, ती विलायती गाणी नाहीत, तो रुबाब नाही. सारखा आपला तडतडतड आवाज. वाजला, न वाजला, सारखा.** (त्याला फार वाईट वाटते आहे.) **हे असले कपडे. असला मी. सूर्यापुढं काजवा! कशाला जायचं मग रात्री वरातीला? पाटलांना ब्यांड हवा. पाटलिणीला पण ब्यांड हवा. ताशा कुणाला नको. कुणालाच नको. नाहीच जायचं वरातीला. लग्नाला पण नाही जायचं. यापुढं कुठलंच लगीन वाजवायला नाही जायचं. जन्मात नाही. कध्धी नाही.** (गुडघ्यांत तोंड खुपसून बसून रहातो.)



[मुलगा ५ काठीच्या आधाराने लंगडी घालीत घालीत येतो. कपडे ठिगळलेले. दिसायला हाडकुळा, बावळट. एक हातही वाकडा. एकंदरीने 'पेंद्या'चा अवतार. हा बाजा. लंगडा आणि वर तोतरा.]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५६५०

*मुलगा ५* : (तोतरत, कुठे कुठे फार तोतरत; पण प्रेक्षकांना कंटाळा यावा इतके तोतरत नव्हे)

**क्-क्-क्काशीनाथ प्पंत ताशेवाले ! अहो—क्-क् क्काशीनाथ-पंत -ताशेवाले. क्काशीनाथ प्पंत, ऊं-असे का ब्बसलात ? तोंड घालून ? दुखतं वाटतं-ऊम्-डोकं ? क्-क्-का ताप-बीप ?**

*मुलगा १* : (न बघता) **काही नाही.**

*मुलगा ५* : **म-उम्-मग असे हूं-का बसलात ? तोंड घालून ? क्-क् क्काहीतरी हूं—असणार !**

*मुलगा १* : **तू जा बरं तुझ्या कामाला, लंगड्या.**

*मुलगा ५* : **म्-म्-उम्म्-मला हूं-नाहीच. काम् ! क्-क्-कुणी देतच-नाही. म्-म्-म्मीं-करतो म्हटलं-तर-हूं-लोक-हूंच-हसतात ! उम्म्-मला ल्-लंगडा त्-त्-त्तोतरा म्हणतात. हूं-चिडवतातसुद्धा. लहान पोरं-दगडसुद्धा-मारतात. त्-त्-तुमचं काही-काम-असलं तर-ऊं-सांगा.** (हावभावानेच) **मी करीन !** (शब्दांत) **म्-म्-म्हणजे हवं तर ! तुम्हाला.**

*मुलगा १* : **नको.** (पुन्हा गुडघ्यांत तोंड.)



[मुलगा ५ थोडा वेळ तसाच उभा. मग हळूच बसतो मुलगा १ शेजारीच, जरा लांब. एक शिंक येऊ पहाते ती आवरण्याचा प्रयत्न करून अखेर देतो मोठ्यांदा.]

*मुलगा १* : (पाहून) जा म्हटलं ना तुला ?

*मुलगा ५* : म्—मी नुसता हूं—बसलोंय.

*मुलगा १* : कशाकरता बसलास ?

*मुलगा ५* : चालून चालून—हूं—म्हणून. दमलों म्हणून. उम्—दुखले. पाय. फार. (स्वतःच स्वतःचे पाय चेपतो.)

*मुलगा १* : (त्याला तसा पाहतो आणि त्याही स्थितीत हसून) लंगडा तो लंगडा, पुन्हा तोतरा. आणि वर वेडासुद्धा थोडासा ! लंगड्या, मला काय झालंय ते तुला सांगून काय उपयोग ?

*मुलगा ५* : (उत्साहाने) उम्—मी—बहिरा नाही काही ! उम्—फक्त—त्—त्—तोतराच हूं—आहे. मला ऐकू येतं.

*मुलगा १* : ऐकून काय करशील ?

*मुलगा ५* : ऊं—जाईन. निघून !

*मुलगा १* : प्रामाणिक आहेस खरा. अरे, पाटलाच्या वरातीला आज शहराचा ब्यांड आणणार आहेत.

*मुलगा ५* : (मानेनें नकार दर्शवीत) ऊम्—ऊंहूं—पाटलाच्या—हूं—मुलीचं—लगीन !

*मुलगा १* : तेच.

*मुलगा ५* : (प्रयासाने) नव्हे—

*मुलगा १* : ऐक. तर पाटलाची, पाटलिणीची इच्छा आहे फार, लगीन फाकडू झालं पाहिजे म्हणून. ब्यांड बोलावलाय—शहरचा.

*मुलगा ५* : (आवाज, हावभाव यांच्या मदतीने बसल्या बसल्या ढोल, ड्रम, बिगूल वाजवतो.) हूं !

*मुलगा १* : तोच. (उदास बसून राहतो.)

*मुलगा ५* : उम्—मग तुम्ही पण—हूं—वाजवा. ताशा.

*मुलगा १* : कशाकरता ? ब्यांडपुढं तो कोण ऐकणार ? कुणाला त्याचं तिथं कौतुक ? मी मुळी आज वरातीला जाणारच नाही.

*मुलगा ५* : (हावभावाने 'जा' असे सुचवीत) हूं !

*मुलगा १* : (उसासा टाकून) अरे, ब्यांडपुढं ताशा म्हणजे सूर्यापुढं काजवा. पाटलाचा गडीच म्हणत होता. आणि खरंच आहे ते. मग कशाला जायचं रात्री वरातीला ? सर्वांना ब्यांड हवा ! ताशा नको ! ब्यांडचा पोषाक रंगी, जरीचा; आवाज मोठा; त्यात त्याची विलायती गाणी. आणि पुन्हा तो शहरचा. आमचं काम खेडवळ. ते पुष्कळ लोक, मी एकटाच. खरं म्हणजे गावातलं लगीन वाजवायचा आमचा पिढीजात मान. पण

पाटलानं ब्यांड बोलावला. गाडी धाडली आणायला. आपण कशाला वरातीला जाऊन उगीच आता आपली शोभा करून घ्यायची? कशाला हसून घ्यायचं? कशाला नको असताना जायचं? त्यापरीस रहावं घरीच. कुणी विचारलं, तब्येत बरी नाही सांगेन. जातो. (उठतो. सावकाश, जड पावलांनी चालू लागतो.) रामराम.

*मुलगा ५* : (झपाट्याने उभा राहून लंगडत त्याच्यामागे धावत) ऊं–कू काशीनाथ–पंत–ताशे–हूं–वाले–ऊं–(त्याला अडवून) तुम्ही जाच–व–वरातीला. वाजवा–ताशा. तुमचा तो हूं–हक्कच आहे. सोडू नका!

*मुलगा १* : काय कपाळ सोडूं नका? तुला काही समजत नाही, लंगड्या— वरातीमागून घोडं म्हणतात तसा मी वरातीमागून जाऊ म्हणतोस? अरे घोड्याच्या पुढं माझा मान! तो ब्यांडनं घेतलेला पाहू? छट्! पाटलाच्या मुलाची वरात वाजेल तर फक्त या काशा ताशेवाल्याच्या घनचक्कर ताशानंच. (उसासून) पण ते तर आता होणं शक्य नाही. (जाऊ लागतो.)

*मुलगा ५* : (पुन्हा मागे जाऊन त्याला अडवीत) ऊं—ताशेवाले—ऊं–कू—करून—दाखवलं तर? मी?

*मुलगा १* : (हसून) तू!

*मुलगा ५* : (अनावर आवेशाने) ऊं—मीच! त्-ताशेवाले, तसा हूं—मी हा नाही. स्-साधा! उम्—मी—हूं—दाखवतो-करून! ऊं—म्माहीत नाही—तुम्हांला—काय आहे ते-मी म्हणजे!

*मुलगा १* : जा, आपल्या वाटेनं जा लंगड्या—जा—

*मुलगा ५* : ऊं—लावता? पैज?

*मुलगा १* : पैज? तुझ्याशी? काय खुळा समजलास काय मला, खुळ्याशी पैज लावायला!

*मुलगा ५* : पहा—वरं—ऊं-होईल! (बऱ्याच प्रयत्नांनी) पश्चात्ताप!

*मुलगा १* : झाला!

*मुलगा ५* : काय-ऊं-द्याल? म्-मी-हूं-तर? जिंकलो तर?

*मुलगा १* : (गमतीने) लग्नात मिळतील तितके लाडू देईन!

*मुलगा ५* : (टाळ्या पिटीत) लाडू! लाडू! ऊं-बरेच दिवसात नाहीत मला—मिळाले—लाडू. (पुन्हा टाळ्या पिटतो.) जातो. रामराम—

*मुलगा १* : कुठें जाणार?



*मुलगा ५* : ऊं-सांगायचं-नसतं! गुपित आहे! म्-म्-मग सांगेन. हूं. (थांबून) प्-पण-तुम्ही-हूं-वरातीला-जायचं. ऊं-बसायचं नाही. बाकीचं—पाहतों.

तापवून ठेवा ! त्–ताशा–हूं–चांगला. वाजला पाहिजे–कडकडकड धूम–कडकडकड–हूं ! (जातो लंगडत उत्साहाने.)

[मुलगा १ मागे रहातो.]

*मुलगा १* : लंगडा, तोतरा आणि बावळट आहे बिचारा. मनानं चांगला आहे, पण काय उपयोग? अख्खं गाव याची चेष्टा करतं. याला हुडुत् हुडुत् करतं. लोक म्हणतात, बाजाला प्रश्न विचारावा नि उत्तर ऐकायला जेवून, वर एक डुलकी मारून खुशाल यावं! याची चाल तर काय विचारतां! गाववाले म्हणतात, एकदा बाजाला त्याच्या बापानं सांगितलं, मुंग्यांना साखर घालायला. थोड्या वेळानं बाप बघतो तर बाजा मोठ्यांदा रडत बसलेला. बापानं विचारलं, "काय रे बाजा, रडतोस का? साखर सांडली वाटतं?" बाजा रडत रडत म्हणाला, "न्—न्—नाही बाबा. म्—म् मुंग्याच पळाल्या!" असा हा बाजा. हा काय काम करणार? पण करतो म्हणाला, तर करू दे काय करतोय तें. ब्यांड येणार हे आता ठरलच आहे. आपण जाऊ नये म्हणजे झालं वरातीला. घरीच राहावं. (उसासा टाकून) ब्यांडपुढं ताशा म्हणजे सूर्यापुढं काजवा म्हणे. . . दिवस फिरले खरे. . .(खोटा खोटा ताशा उचलून घेऊन जातो.)



[आता लंगडा-तोतरा मुलगा ५, गेला त्याच्या विरुद्ध बाजूने, लंगडी घालीत स्टेजवर येतो आणि बसतो एका ठिकाणी; पण हे ठिकाण मुलगा १ बसला होता ते मात्र नव्हे.]

*मुलगा ५ :* (न तोतरता) **आता मी बोलताना तोतरत नाही, कारण मी हे मनातल्या मनात बोलतोय. आणि तोतरा माणूस मनातल्या मनात बोलताना तोतरत नाही. तर, शहरच्या वाटेवर हा मी गावापासनं लांब येऊन बसलोय. पाटलाची गाडी बँडवाल्यांना घेऊन येणाराय, तिची वाट मी पहातोय. पण फूस् नाऱ्या! संध्याकाळ झाली, काळोख पडू लागला तरी गाडी काही येत नाही.** (राहतो बसून.)



[घुंगूर वाजू लागतात. पुढे पाटलाचा गडी (मुलगा ३) त्याच्या सदऱ्याचा मागचा सोगा धरून मुलगा ६. यापुढे आगगाडीसारखे आणखी मुलगा ७, मुलगा ८, मुलगा ९. हे बँडवाले. ही मंडळी खोट्या खोट्या बैलगाडींतून येतात. येत नाही असे दाखवून मुलगा ४ (कुत्रा) जीभ बाहेर काढून मागून येतो. ही मंडळी स्टेजच्या मधोमध येऊन थांबतात. बँडवाल्यांना जरीचे पोषाख अर्थातच नाहीत, पण त्यांचे असतील ते पोषाख एकसारखे एक असावेत. शाळेचे गणवेष चालतील. कौंटी टोप्या असल्यास त्याच घालाव्या.]

*मुलगा ६* : (बँडवाल्याच्या शहरी रुबाबांत) **काय हो गाडीवाले, अजून किती लांब आहे तुमचं गाव?**

*मुलगा ७* : **एवढा काळोख पडला तरी अजून कसं येत नाही?**

*मुलगा ८* : **रस्त्याला दिवेसुद्धा नाहीत काय हो गाडीवाले, इलेक्ट्रिसिटी सुद्धा नाही वाटतं तुमच्या गावात!**

*मुलगा ९* : **आणि तुमच्या पाटलाकडे साधी 'कार'सुद्धा नाही! मोटार गाडी! बैलगाडीवाला तुमचा पाटील!**



*मुलगा ६* : म्हणजे बैलच ! (सारे हसतात.)

*मुलगा ७* : बैल तो बैल आणि लग्नात बँड हवा ! (पुन्हा सगळे हसतात.)

*मुलगा ८* : मुलीचं लग्न तरी माणसाशीच करून देतोय ना ? का आहे कुणी— (हंबरतो. पुन्हा हसतात सगळे.)

*मुलगा ७* : पैसे देईल ना तो आमचे सगळे ? नाहीतर ते सुद्धा नसायचे त्याच्याकडे !

*मुलगा ६* : (नाक उचकीत) हे व्हिलेज पीपल म्हणजे भलतेच अडाणी बुवा !

*मुलगा ७* : हो ! नाही तर आमची विलायती गाणी; तुमच्या अडाणी पाटलाला आणि त्याच्या गाववाल्यांना ती काय कळणार !



*मुलगा ८* : गाढवाला गुळाची चव काय कळणार !

*मुलगा ९ :* हंऽ. चला झालं. पाहू या जाऊन कसं असतं या खेडवळ लोकांचं लग्न ते. हं, गाडीवाले, चला लौकर. काळोख पडत चालला. (कुत्र्याला) अरे हाड् ! (मुलगा ४ लांब पळतो मागच्या मागे.) कुठलं कुतरडं मागं लागलंय केव्हापासनं ! शहरची कुत्री कशी फॅशनेबल ! चला, गाडीवाले.

[स्टेजवर सगळे गोल फिरतात, खोट्या-खोट्या बैलगाडींतून. घुंगुर फक्त खरे. मागोमाग मुलगा ४ (कुत्रा). पुन्हा मूळ जागी येऊन थांबतात.]

*मुलगा ६ :* अजून येत नाही की तुमचा गाव ! आणि ही गाडी म्हणजे खटारा आहे नुसता ! अंग आंवळं पार !

*मुलगा ७ :* छया ! डोळे ताणले तरी काही दिसत नाही. काय हो, लाइट बीट नाहीत वाटतं या तुमच्या गाडीला ?

*मुलगा ८ :* लाइट ! अरे चाकं आहेत हें नशीब समज !

*मुलगा ९ :* उगीच आलो बुवा—सुखाचा जीव दुःखात. शहरात कसे पेट्रोमॅक्स असतात वरातीबरोबर.

*मुलगा ८ :* हा पाटील बहुतेक कंदील घेऊन वरात काढणार ! (सगळे हसतात; हसतांना मध्येच एकदम गप्प होतात.) कोण ओरडलं रे ?

*मुलगा ७ :* कोण बरं ? कुठं—कोणी नाही.





*मुलगा ६* : मी ऐकलं.

*मुलगा ७* : खरं म्हणतोस ?

*मुलगा ८* : मी सुद्धा ऐकलं.

*मुलगा ९* : (ऐकून) छे, अंगावर कांटा येतोय. म्हणजे मी तसा ‘हा’ नाही; पण...

*मुलगा ८* : (ऐकून) पुन्हा कोणी नाही.

*मुलगा ७* : दिवा हवा होता. (एकदम) ते पहा ! वाघ ओरडावा तसं !

*मुलगा ६* : वाघ नव्हे—सिंह. सिनेमातला.

*मुलगा ३* : (म्हणजे गाडीवाला) अवं कोल्ही नव्हं का ती.

*मुलगा ९* : (धसकून) को—ल्ही ? म्हणजे—खरी ?

*मुलगा ८* : इसापच्या गोष्टीतली ?

*मुलगा ७* : (मुलगा ८ ला बिलगत) फार धूर्त असतात म्हणे.

*मुलगा ६* : ते पहा—पुन्हा ओरडलं !

*मुलगा ७* : त्यांत अंधार ! गाडीवाले, एकादी बॅटरीबिटरी आहे का तुमच्याकडे ? (त्याचा नकार.) कशी असणार ! बोलूनचालून गावढळ माणसं ! अंधारात बॅटरी जवळ ठेवावी हे तरी कळायला हवं ना ?

*मुलगा ८* : काय होणार कळत नाहीं.

*मुलगा ७* : उगीच आलो रे आपण ! कसलं कर्माचं त्या सोम्यागोम्या पाटलाच्या फडतूस पोरीचं लगीन आणि त्याला म्हणे बॅंड हवा !

*मुलगा ६* : परतूं या का आपण ? मला—नाही म्हणजे तशी फार नाही वाटत—पण वाटते. भीती रे.

*मुलगा ७* : गाडीवाले, काय चार मिनार, पिवळा हत्ती, डिलक्स टेनॉर, काही आहे का जवळ ?

*मुलगा ३* : (गाडीवाला) बिडी हाय.

*मुलगा ६* : (किंचाळत) बिडीऽ !

*मुलगा ७* : चिलीम नाही का ! म्हणे बिडी ! आपण तर गारठू लागलो.

*मुलगा ८* : भारीच काळोख पडला रे ! डोळ्यांत बोट घातलं तरी दिसत नाही !

*मुलगा ३* : (म्हणजे गडी) आता तुमीच मंडलींनी निगायला टेम लावला, त्याला म्या
काय करनार ? तरी सारखा म्हंगत होतों, निगा, निगा ! अंधार पडंल !

*मुलगा ९* : दीडशहाणाच आहेस ! केसांचा कोंबडा पाडल्याशिवाय मी घराच्यासुद्धा
बाहेर पडत नाही. मग काय गावाच्या बाहेर पडू ?

*मुलगा ८* : आपल्याला बुवा रोज दोनदा दाढी करावी लागते !

*मुलगा ७* : माझी टोपीच नीट कोन करून बसेना. उगीच बावळटासारखा कसा
येऊ बँड वाजवायला ?

*मुलगा ६* : माझ्या कोटाची जर निघाली होती. लावून घ्यावी लागली.

*मुलगा ९* : आणि माझा कंगवा सापडेना. (खिशातून कंगवा काढून कोंबडा पाडतो
केसांचा आणि खिशात ठेवतो पुन्हा.)

*मुलगा ८* : त्यात माझ्या एका बुटाचं पॉलीश गेलं होतं. करून घ्यावं लागलं.

*मुलगा ७* : मी माझ्या तुमानीला इस्त्री करून घेतली. हो, चुरगळली म्हणजे कशी
विदूषकाच्या तुमानीसारखी दिसते !

*मुलगा ९* : ओ—ओरडलं ! अग आई ग !



*मुलगा ३* : (गडी) अवं कोल्ही नव्हं ती !

*मुलगा ८–७–६* : (एकमेकांना बिलगून थरथर कापत) कोल्ही ऽ !

*मुलगा १ :* (त्यांना बिलगत) फार धूर्त असतात म्हणे.

*मुलगा ८ :* गाडीवाले, लौकर हाका दाढी ! नव्हे गाडी.

[मुलगा ४ (कुत्रा) भुंकतो, कुठल्या तरी दिशेने.]

ओ—ओरडलं ! पुन्हा ओरडलं !

*मुलगा ७ :* कसं व्हायचं आपलं, कोण जाणे !

*मुलगा ६ :* त्यांत हा मिट्ट काळोख !

*मुलगा ३ :* (गडी) अवं रोजच असतोय त्यो ! आन् कोल्ह्यान्ला काय डरताय राव यवडं ? आमाला तर वाघबी भेटतो दिवसातनं दोनदा !

*मुलगा १ :* (हबकून) वाऽघ !

*मुलगा ८ :* दिव्–दिवसातनं दोनदा !

*मुलगा ३ :* व्हय. वाघनाथाचा डोंगर ह्यो सामनेच नव्हं का.

*मुलगा ७ :* अग आई ग ! (एकमेकांना पकडून सगळे कापत उभे.)

*मुलगा ३ :* बसा बरं गुमान. ह्यो सोडतो गाडी या उतारावर भिन्नाट बगा आता ! का घटकाभरात गावात !



[गाडी सोडतो जोरांत. म्हणजे घुंगूर वाजवीत फिरतो गोल. मागोमाग आगगाडी करून बँडवाले. मागोमाग मुलगा ४ (कुत्रा).]

*मुलगा ५ :* (हा आतापर्यंत नुसता बसून आहे. आता हा एकदम किंचाळतो) **भ्–भ्–भूत !**
**भूत ! भूत !**

[सगळे बँडवाले कोसळतात एकमेकाच्या अंगावर. बोबड्या वळलेल्या सगळ्यांच्या. गाडीवाला (मुलगा ३) गाडी रोखतो.]

*मुलगा ३ :* **कोन हाय त्ये ? कोन वरडतंय ? साद् द्या ! कोन हाय ?**

[खोट्या-खोट्या अंधारात चाचपडत मुलगा ५ येतो लंगडी घालीत पुढे. 'भ्–भ्–भूत' करून सगळे बँडवाले एकमेकावर पुन्हा कोसळतात.]

**कोन त्यो ? नाव काय तुजं ?**

*मुलगा ५ :* **म्–म्–मी !**

[पुन्हा बँडवाले 'भूत' ओरडून डोळे घट्ट मिटून घेतात ]

*मुलगा ३ :* **कोन ? बाजा व्हय ! हात्तिच्या ! काय रं लंगड्या, तूं हिकडं कुटं ?**
**इकत्या लांब ? आन् या टैमाला ? आ ?**

*मुलगा ५ :* **भ्–भ्–भूत !** (पुन्हा किंचाळतो.)

[बँडवाले पुन्हा कोसळतात एकमेकांच्या अंगावर.]

*मुलगा ३ :* **अरं काय म्हनतुयास ? कुटलं भूत ? का उगा क्येकाटतुयास ? आरं**
**बोल की मर्दा !**

*मुलगा ५* : (तोतरत) त्–त्–त्या–घळींत ! प्–प्–पिंपळाच्या झ्–झाडावर ! (पुन्हा किंचाळतो.) भ्–भ्–भूत ! भूत !

[बँडवाले कोसळतात. ‘राम’ ‘राम’ म्हणू लागतात.]

*मुलगा ३* : वरडू नगं उगा ! कुटं दिसलं ? कसं दिसलं ? बस गाडीत वरं ! सोडतो तुला गावात !

*मुलगा ५* : न्–न्–नको ! भ्–भूत ! त्–तिथे ! व्–व–वाटेत ! प्–प्–पिंपळाच्या–झाडावर !

[बँडवाल्यांत चांगलीच घबराट. ‘राम’ ‘राम’ चा जप जोरात. डोळे घट्ट मिटून घेतलेले.]

*मुलगा ३* : मग असलं तर काय खातं काय मर्दा आपल्याला ! चल, बस गुमान. हाणतो गाडी.

*मुलगा ९* : (रामाचा जप थांबवून किंचाळतो) नकोऽ ! नको !

*मुलगा ८* : नको !

*मुलगा ७* : आम्ही नाही येणार !

*मुलगा ६* : भू–भूत म्हणजे काय चेष्टा आहे !

*मुलगा ५* : (पुन्हा किंचाळतो) भ्–भूत ! भूत ! भूत !

[बँडवाल्यांत पडापडी.]

*मुलगा ३* : आता का उगा गळा काढतुयास लंगड्या ? गुमान बस गाडीत ! चल

बस ! वरातीचीं टेम झाली ! पाटील करत्याल ठणाणा !

*मुलगा ६* : करू देत ! ('राम' 'राम' 'राम' 'राम'...चालूच)

*मुलगा ७* : तोच बँड म्हणावं ! (रामाचा जप चालू.)

*मुलगा ८* : राम राम राम राम...आम्ही नाही येत ! राम राम राम...

*मुलगा ९* : आम्ही जातो परत ! राम राम राम...

*मुलगा ८* : कुठनं निघालो या खेडवळावरोबर ! चला, उतरा रे.

[सगळे उतरून उभे राहतात.]

*मुलगा ६* : कोल्हा !

*मुलगा ७* : वाघ !

*मुलगा ८* : भू—भूत !

*मुलगा ५* : (किंचाळतो पुन्हा एकदा) भू—भूत ! भूत ! भूऽत !

[बँडवाले पळून जातात आल्या दिशेनें परत.]

*मुलगा ३* : (जिवाच्या आकांताने) अवं—अवं—ब्यांडवाले—अवं तुमी—(ते परत येत नाहीत. हताश होतो. मुलगा ५ (लंगड्या) ला) आता क्येलीस का मर्दा पंचाइत ! पाटील जित्ता खाइल की मला ! अन् पाटलीन ! तुजं झालं भूत पन इथं माजा जानार गळा आता ! पाटलाला कसं दावावं त्वांड आता ? (बसतो दुःखाने.

त्याच्या शेजारी मुलगा ४ (कुत्रा) येऊन बसतो. त्याला 'हाड्' करून हुसकवतो.)

*मुलगा ५* : **म्—मी—सांगू का? प्—प्—पाटलाला—हूं-सांगूच—न्—नका ब्—व्—व्यांडवाले—पळाले उम्—उम्—म्हणून!**

*मुलगा ३* : **मग काय करू, लंगड्या?**

*मुलगा ५* : **आलेच न्—न्—हूं!**—(बाकी हावभावाने.)

*मुलगा ३* : **आले न्हाईत म्हनू? आरं पन आनायला सांगितलं व्हतं न्हवं मला? त्यान्ला घेतल्याबिगर येऊं नगंस असं म्हंगाली व्हती पाटलीन!**

*मुलगा ५* : **ऊं—द्—दुसरं—ल्—लगीन निघालं—म्—म्—हूं! म्हणा!** (हावभावाच्या मदतीने) **गेले म्—म्हणावं! आले नाहीत! म्—म्—मी येतो ना—ऊं—सांगायला!**

*मुलगा ३* : (थोडा विचार करून) **बारं! चल बस गाडीत. हान्तो जोसात. काय तुजं भूतबीत आसंल तेच्या पारच पळवतों गाडी.**

*मुलगा ५* : (हाताने 'नाही' 'नाही' दाखवीत) **त्—त्—तिकडे—घळीत. प्—प् पिंपळावर! हूं!**

[मुलगा ३ खोटी खोटी गाडी पळवतो गोल गोल. घुंगुर वाजत जातात. मुलगा ५ मजेत टुण्दिशी उडी मारल्यासारखा अभिनय करीत मुलगा ३ च्या पाठीला पाठ लावून उभा रहातो आणि गाडीत

बसल्यासारखा फिरतो हिंदकळत. त्यांच्यामागून मुलगा ४ (कुत्रा).]

*मुलगा ३* : (मध्येच थांबून) **लंगड्या, गेलं का?**

*मुलगा ५* : **ऊं? कू—कू—कोण?**

*मुलगा ३* : **आरं भूत!**

*मुलगा ५* : **ऊं—गेलं.** (प्रेक्षकांना) **न्—नव्हतंच!**

[तिघे जातात.]

*मुलगा १* : (येतो) **खूप रात्र झाली. आज घरांत दिवा पण नाहीं लावला. कशाला लावायचा? अंधार बरा.** (कान देऊन) **अजून पाटलाच्या लग्नाची वरात कशी नाही निघाली? असेल—जेवणावळ उठायला उशीर झाला असेल. नवरामुलगा रुसून बसला असेल, सोन्याचं घड्याळ नाहीतर करवतकाठी धोतरजोडा हवा म्हणून. पण ब्यांड घेऊन गाडी कशी नाही जाताना दिसली इथून?**

[गेले त्याच्या उलट बाजूने मुलगे ३, ४ आणि ५ (३–५–४ या क्रमाने) घुंगुर वाजवीत येतात आणि हिंदकळत, दुडकत जातात निघून दुसऱ्या बाजूला.]



**ही आली गाडी—ही गेली!** (डोळ्यांवर हात धरून खोल्या खोल्या अंधारांत पहाण्याचा प्रयत्न करतो.) **छे, काही दिसत नाही काळोखात. पण गाडी**

पाटलाचीच. (उसासा टाकून) ब्यांड आला म्हणायचा. ब्यांडपुढं ताशा म्हणजे...जाऊ दे ! नको तो विचार ! आजपासनं ताशा वाजवणंच सोडलं आपण—आणि हे गाव पण सोडून जाणार. कुठंही जाईन. मिळेल ते खाऊन राहीन. पण इथं नको.

[मुलगा २ (बहुरूपी) येतो.]

कोण आहे ते ? कोण आहे ?

*मुलगा २* : मी.

*मुलगा १* : कोण मी ?

*मुलगा २* : आ—म्ही.

*मुलगा १* : अरे काय नाव-गाव काही आहे का नाही तुला ?

*मुलगा २* : ठणठणपूरचा इनामदार. भिकारगावचा जहागीरदार. बसाडवाडीचा वतनदार आणि उलट्या अंबारीचा म्हाराज चक्रमादित्य. निग्गा रख्खो महाराज...(तोंडाने तुतारी.)

*मुलगा १* : तू होय. काय रे नाऱ्या ? इतक्या रात्रीचा इकडे कसा ?

*मुलगा २* : दिवस संपला म्हणून रात्रीचा. इथनं एकादा रथ गेला काय ?

*मुलगा १* : रथ ? रथ जायला हे काय पुराणातलं हस्तिनापुर आहे होय ?

*मुलगा २* : मग विमान ?

*मुलगा १* : काय वेड का काय ! विमान जायला काय ही इंद्राची अलकावति आहे ?

*मुलगा २* : मऽग...जहाज—जहाज ?

*मुलगा १* : (हसत) जहाज ! नारायणराव, जहाज जमिनीवरनं कधीपासनं चालू लागलं ?

*मुलगा २* : हात्तिच्या ! उत्तर सरळ आहे ! आपला पाटील शहरचा ब्यांड बोलावू लागल्यापासून ! द्या टाळी ! (स्वतःच देऊन) आणि अहो, अजून ब्यांडचा पत्त्या नाही ! तिकडं वरात केव्हाची खोळंबलीय. पाटील डोकीला हात लावून बसलाय, चौदा चौकड्याचं राज्य हरल्यागत ! आणि पाटलीण बसलय रुसून ! नवऱ्यामुलाचा बाप न् आईस संतापानं उडतायत बेडकावाणी टणाटण. आणि वऱ्हाडी मंडळी सगळी शेण घालतायत पाटील-पाटलिणीच्या तोंडात.

*मुलगा १* : असं ?

*मुलगा २* : तर आणखी कसं ? म्हणतात, गावचा आपला ताशा सोडून हे ब्यांडचे शहरी थेर करायला सांगितले कुणी पाटलाला ?

*मुलगा १* : खरं ?



*मुलगा २* : होय बरं ! (तोंडाने आणि शक्य तर काखेत पंजा ठेवून दंड कुशीवर आपटून त्याचा ताल धरीत; न जमल्यास साध्या टाळ्या मारीत)

आज्या नको

बाज्या नको

ताशा बरा आपल्या गाववाल्याचा !

पाटलीणबाई

लगीनघाई

हट्ट नको आता ब्यांडवाल्याचा !

ताशा बरा आपल्या गाववाल्याचा ॥

लंकेत सोनं

दिडकी गोणऽ

'छोन्या' बरा घरचा हक्काचा !

ताशा बरा आपल्या गाववाल्याचा ॥

पों पों रे पों

ठो ठो रे ठो

बाज्या नाही आपल्या कामाचा !

ताशा बरा आपल्या गाववाल्याचा ॥

('रामराम' करून चालू लागतो.)

*मुलगा १* : खोटं म्हणत असावा नाऱ्या. चेष्टेखोरच तो. चेष्टा करीत असणार.

[मुलगा ३ (गडी) येतो धापा टाकीत.]

*मुलगा ३* : पाटीऽल—अवं पाटीऽल—पाटील...(सावरत) न्हवं, काशा ताशेवालेच ना तुम्ही ? व्हय. त्येच तुम्ही. मंग निगा तर बेगीन ! पाटील बोलावत्यात. वरात खोळंबलीय. चला चला चला—आताच्या आता चला ! ताशा घिऊन चला ! आदी चला !

*मुलगा १* : (आनंदत) अरे पण ब्यांड—

*मुलगा ३* : ब्यांड न्हायला शहरांत. तुम्ही चला आदुगर.

*मुलगा १* : पण तो आणायला गेला होतास ना गाडी घेऊन—

*मुलगा ३* : आता का पिडतायसा उगा ? निगा बरं—हां–चला चला चला—

*मुलगा १* : आणि तो लंगडा वाज्या—तो कुठं आहे ?

*मुलगा ३* : असंल वाटेवर तिकडं घळींत, न्हाय तर पिंपळाच्या झाडावर भुतासंगट बसलेला. मला न्हाय म्हायत. पाटलांनी जाम नरम केला त्याला. पन आदी चला वरं तुम्ही. न्हाय तर माजी वी धडगत न्हाय्—



[मुलगा १ आता घरात गेल्याची बतावणी करून आत जाऊन येतो. गळ्यात खोटा खोटा ताशा. पुन्हा धावत 'काठ्या विसरलोच' म्हणत आत जातो आणि परत येतो. पुन्हा 'पटका राह्यलाच की ' म्हणून

आणखी एकदा आत जाऊन येतो. दरम्यान मुलगा २ उशीर होतो म्हणून कासावीस होऊन उभा.]

*मुलगा १* : **चला.** (दोघे निघतात आणि मध्येच) **हात्तिच्या ! सगळंच मुसळ केरांत ! वहाणाच विसरलो !**

[पुन्हा पळत जाऊन त्या घालून येतो. मुलगा २ पुढे आणि हा मागे असे जातात निघून. किंचित् वेळ गेल्यावर मुलगा ५ येतो लंगडी घालीत. हा आता जास्तच लंगडतो आहे. पाठ, कंबर धरून विव्हळतो आहे.]

*मुलगा ५* : **कु-कु-काशीनाथशेट—ओ, कु-काशीनाथशेट—**(ओ नाही.) **ऊं—नाहीत !** (बसतो एका जागी हताश होऊन.) **आता मी जरा मनात बोलतो, झालं. एवढी खटपट करून बँडवाल्यांना पळवलं आणि वर पाटलाच्या हातचा** (कंबर पकडून विव्हळत) **खरपूस मार पण खाल्ला. आणि या काशा ताशेवाल्याचा पत्ताच नाही ! तरी वजावून गेलो होतो की वरातीला जा. फुकट गेली खटपट आणि अंग पण** (विव्हळतो) **दुखतंय खूप ! अगाई ग !**




[ताशाचा आवाज ऐकू येऊ लागतो. हा हवा तर, पत्र्याचा डबा काड्यांनी बडवल्यावर येतो तसला चालेल. मुलगा ५ एकदम टवकारून ऐकू लागतो. ताशाचा आवाज मोठा मोठा होतो. मुलगा ५ गडबडीने उठतो आणि दुखरी कंबर धरून बघू लागतो त्या दिशेला.]

***मुलगा ५ :* वरातच आली की ! पण ताशा कोण वाजवतंय ?**

[इथे पाटलाच्या पोरीच्या लग्नाची वरात स्टेजवर येणार. पडद्यातून ताशा ऊर्फ पत्र्याचा डबा जोरजोराने बडवणे. वरातीत पुढे काशा ताशेवाला खोटा-खोटा ताशा आवेशाने बडवतो आहे. त्याचे पवित्रे, खऱ्या ताशेवाल्यासारखे हुबेहूब हवेत. गुडघ्यांत मुडपून वाजवतो, पोट पुढे काढून आणि डोके मागे नेऊन वाजवतो, एक पाय पुढे रोवून वाजवतो, दोन्ही पाय फाकवून वाजवतो, मागे पुढे झुलत वाजवतो —असे सर्व प्रकार. मान वाकडी. चेहऱ्यावर तद्रूप आविर्भाव. त्याच्यामागून थोडी थोडी वरात स्टेजवर येते. यांत शिल्लक असलेली सर्व मुले. कुणी खोटा लेजीम वाजवताहेत. कुणी खोटा दांडपट्टा खेळताहेत. कुणी खोटी बोथाटी फिरवतो आहे. कुणी दोघे खोटा फरीगदगा खेळताहेत. आणि कुणी नुसतेच नाचताहेत. त्यानंतर नवरा-नवरी खोट्या घोड्यावर बसलेली. नवरा पुढे, नवरी त्याच्या मागे. (हे सोंग मुलानेच डोक्यावरून कसला तरी पदर घेऊन वठवले तरी चालेल.) नंतर पोटे पुढे काढून एकेक पाऊल टाकीत, ढेकर देत, वऱ्हाडी मंडळी. यांतच बहुरूपी नाऱ्या, पाटलाचा गडी, आणि, शक्य असल्यास, मिरवायला काही साळकाया म्हाळकाया (एकादीच्या कमरेवर हवे तर रडके पोर) वगैरे. वरात मुंगीच्या गतीने स्टेजवरून पुन्हा आत जाते निघून. पत्र्याचा डबा ऊर्फ ताशा

अजून ऐकायला येतोच आहे जोरजोराने. मागे एकटा उरतो मुलगा ५ म्हणजेच लंगडा–तोतरा बाजा, बावळट, वेडाबगडा—वरात गेली तिकडे पहात तो तोंडभर हसतो आहे...]



# मो ठ्यां सा ठी

पुष्कळ मुलां-मुलींनी मिळून वर्गात करण्यालायक नाटके (class-room plays) ही आपल्या बालवाङ्मयातली आणि नाट्यवाङ्मयातलीहि एक महत्त्वाची उणीव आहे. ही उणीव भरून काढण्याचा हा एक प्रयत्न.

या प्रकारच्या नाटकात देखावे, प्रॉपर्टी इत्यादी गोष्टींचा मुलाहिजा ठेवलेला नसतो. चालचलाऊ सामानावर ही उभी करता येतात. मुले, त्यांची नाट्याची आवड आणि त्यांच्यातले नाट्यगुण हेच अशा नाटकांचे भांडवल. या आवडीला आणि गुणांना भरपूर वाव देऊन त्यांचा विकास साधणे आणि त्याचबरोबर मुलांच्या एकंदर मानसिक आणि शारीरिक विकासाला साहाय्यभूत ठरणे हे अशा नाटकांचे मुख्य उद्दिष्ट

असते. जास्तीत जास्त मुलांना अशा नाटकातून वाव असतो; आणि वर्गाच्या गरजांनुसार तो कमजास्त करता येतो. संवाद हा अशा नाटकात दुय्यम महत्त्वाचा भाग असतो. महत्त्व असते कृतीला. मुलांसाठी लिहिलेल्या कोणत्याही नाटकाप्रमाणे याही प्रकारच्या नाटकातून भरपूर मनरंजनाची तरतूद असायलाच हवी.

प्रस्तुतच्या नाटकात हे सर्व जाणतेपणाने साधण्याचा प्रयत्न केला आहे.

केवळ संवाद तोंडपाठ करून घेण्याच्या आपल्या रूढ शालेय नाट्यपद्धतींत नाटकाचा हा प्रकार प्रारंभी जरासा नवखा वाटला तरी प्रत्यक्ष वापराने नाट्यप्रेमी शिक्षक-मंडळींना आणि मुलांना हाच फार आवडू लागेल असा विश्वास वाटतो.

वर्गाच्या मर्यादेंत जसा हा उभा करता येईल तसा संमेलनादी प्रसंगीं रंगमंचावर देखील सादर करता येईल. तथापी बालप्रेक्षकांचे मनरंजन याहीपेक्षा बालमनातील नाट्यगुणांना आणि त्याद्वारें इतर मानसिक शक्तींना वाव देणे हेच या प्रकाराचे मुख्य उद्दिष्ट आहे.

कुमार बिल्डिंग दोन
हनुमान रोड
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

—विजय तेंडुलकर



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ११६६७० नों. दि. १९/११/०५
वि. ना.ना.

IRBK-0115670

## मुलांसाठीं नाटिका

शेपटीचा शाप [दुसरी आवृत्ति]

झाली काय गंमत !

जादूचा शंख

भटक्याचे भविष्य

□ सई परांजपे

चिमणा बांधतो बंगला [आगामी]

□ विजय तेंडुलकर


मौज प्रकाशन गृह